MHRG140009612025

## <u>आदेश नि. १३ वर</u>

१. सदरचा अर्ज हा प्रतिवादी यांच्यातर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) (ब) व (ड) नुसार दाखल करणेत आलेला आहे. त्यावर प्रतिवादी यांचे असे कथन केले आहे की, वादींनी सदरचा दावा हा वाटपासाठी व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याला हिंदू वारस कायदा कलम ८ व मुदतीच्या कायदयाची बाधा येत आहे. त्यामुळे दावा फेटाळण्यात यावा. त्यांचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकत क्रं. १ ते ४ या मिळकतीत कै. महादेव सुकटया म्हात्रे यांनी सदर मिळकत ही फेरफार क्रं. ५५४८ नुसार त्यांचा एकुलता एक मुलगा बाळाराम महादेव म्हात्रे यांच्या नावे दि. १७/११/१९९० रोजी वर्दी देवून हस्तांतरीत केलेल्या आहेत. त्याची फेरफार नोंद दि.०८/१२/१९९० रोजी मंडळ अधिकारी, कोप्रोली यांनी मंजूर केली असून तो फेरफार आजपर्यंत आव्हानित झालेला नाही. त्यास सुमारे ३५

वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटलेला आहे. वादी यांनी मिळकत क्रं. ५ मध्ये त्यांची वहिवाट नसल्यामुळे फेरफार क्रं. ५७८९ नुसार स्वत:हून वर्दी देवून त्यांची नावे कमी केलेली आहेत. तो फेरफार दि. ०८/०१/१९९६ रोजी मंजूर झालेला आहे. तो देखील आजपर्यंत कोणीही आव्हानित केलेला नाही. सदर दावा दाखल करणेस कोणतेही कारण घडलेले नाही.

२. तसेच सदर दावा मिळकती हया कै. महादेव सुकटया म्हात्रे यांच्या विकत घेतलेल्या मिळकती आहेत. त्यामुळे त्या मिळकती त्यांना त्यांचे वारसांना देण्याचा पूर्ण अधिकार होता. वादी हे प्रतिवादी यांचे वडील कै. बाळाराम महादेव म्हात्रे यांना दिलेल्या मिळकतीमध्ये सह हिस्सेदार होवू शकत नाहीत व त्याचे विभाजन मागू शकत नाहीत. वादी यांनी सदर दाव्यास योग्य ते मुद्रांक शुल्क भरलेले नाही. त्यामुळे सदरचा दावा हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार फेटाळण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

३. सदर अर्जावर वादीतर्फे नि. १४ वर जबाब दाखल करण्यात आला. त्यामध्ये वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज हा खोटा व खोडसाळपणे दाव्याचा निकाल विलंबाने व्हावा म्हणून दाखल केलेला असून तो बेकायदेशीर आहे. सदरचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे.

व दाव्यास घडलेले कारणे वादी यांनी दावा क्रं. ७ व ११ मध्ये तारखेसहित नमूद केलेले आहेत. प्रतिवादी यांनी तलाठी यांच्याकडे वर्दी दिलेली नाही. त्यामुळे फेरफार नोंद मंजूर होवून अधिक कालावधी गेलेला असला तरी वादी यांना त्यांचा हिस्सा मागण्याचा अधिकार आहे. त्यामुळे दावा फेटाळला जावू शकत नाही. प्रतिवादी यांचा बचाव या स्थितीला विचारात घेतला जावू शकत नाही. वादी यांनी दाव्यात योग्य ती कोर्ट फी भरलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचा प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करवा अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. अर्ज व जबाब यातील विवेचन लक्षात घेवून खालील मुददे माझया विचाराधीन आहेत व त्याचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.नु.** | **मुददा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दावा हा दिवाणी प्रकिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ)(ब)(ड) चे तरतूदीनुसार रदद होणेस पात्र आहे का | नाही... |
| २. | काय आदेश | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

५. प्रतिवादीतर्फे सदर अर्जावर लेखी युक्तिवाद नि.२२ वर दाखल केलेला आहे. तसेच त्यांच्या विधिज्ञांनी युक्तिवाद केला की, सदर दावा हा मुदतीच्या कायदा व तरतूदी नुसार आर्टिकल १०९ व ११० तसेच हिंदू वारस कायदा कलम १०८ नुसार फेटाळण्यास पात्र आहे. कै. महादेव सुकटया म्हात्रे यांनी सदर मिळकतीला मुंबई कुळ कायदा ३२ग अन्वये स्वकष्टाने विकत घेतलेले आहेत. त्यामुळे त्या मिळकती कोणत्या वारसांना दयाव्यात हे ठरविण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. सदर मिळकतीबाबत सन १९९० व १९९६ मध्ये फेरफार मंजूर झालेले आहेत. ते आजपर्यंत वादी यांनी आव्हानित केलेले नाहीत. सदर दाव्याला मुदतीच्या कायदयाची बाधा आहे. त्यामुळे दावा फेटाळण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

६. वादी यांच्या वकीलांचा युक्तिवाद केला की, प्रतिवादी यांनी दाव्यात विलंब होणेसाठी प्रस्तूतचा अर्ज कोणत्याही सबळ कारणाशिवाय दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी मोघम स्वरुपाच्या घटना सांगितल्या आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज हा खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे. त्यांनी Adarsh & anr. vs. Virender Kumar & ors of 2018 (P&h)

2157 हा न्यायनिर्णय दाखल केलेला आहे. त्यामध्ये प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कैफियती नुसार वादपत्र नामंजूर करता येत नाही या बाबत कथन केले आहे.

७. अभिलेखाची पडताळणी केली, प्रस्तूतचा दावा हा वाटपासाठी व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांचे कथनानुसार दावा मिळकतीबाबत फेरफार हे सन १९९० व १९९६ मध्ये झालेले आहेत. त्याबाबी वादी यांनी आव्हानित केलेल्या नाहीत. त्यामुळे दाव्यास मुदतीच्या कायदयाची बाधा येते. परंतू, दाव्याच्या वादपत्रात वादी यांचे असे कथन आहे की, फेरफार नोंद क्रं. ५४४८ व ५७७९ बाबत त्यांच्या वडीलांनी तलाठयांकडे वर्दी दिलेली नव्हती. त्यामुळे सदरचा मुददा हा पुराव्याअंती निर्णय घेणे योग्य होणार आहे. वादी हे हिंदू वारसा कायदा कलम ८ प्रमाणे मिळकतीत हिस्सा मागू शकत नाहीत हा मुददा देखील वस्तुस्थितीशी निगडीत आहे. मुदतीच्या कायदयानुसार सदरचा विलंबाबाबतचा मुददा हा विहित कायदे व वस्तुस्थिती या दोघांचा विचार करुन ठरविण्यात येतो. तो संमिश्र स्वरुपाचा मुददा आहे. अश्या परिस्थितीत वादी यांना त्याबाबत पुरावा देण्याची संधी न देता दाव्यास मुदतीतीच्या कायदयाची बाधा येते असे ठरविणे योग्य होणार नाही. तसेच दाव्यास इतर कायदयाची बाधा आहे हे

देखील ठरविता येणार नाही.

८. मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयानुसार आदेश ७ नियम ११ खालील अर्ज निकाली काढताना केवळ वादपत्रात नमूद असलेल्या गोष्टी या विचारात घेतल्या जातात व त्यावेळी कैफियत तसेच बचाव याबाबी विचारात घेतल्या जात नाहीत. प्रस्तूत वादपत्रात वादी यांनी दावा मिळकती हया एकत्र कुटूंबाच्या मिळकती असल्यामुळे त्यांना दावा मिळकतीमध्ये प्रत्येकी १/५ हिस्सा वेगळा करुन मिळावा अशी विनंती केली आहे. त्याचप्रमाणे फेरफार नोंद क्रं. ५५४८ व ५७८९ याबाबत वादी अगर त्यांचे वडीलांनी तलाठयाकडे कधीही वर्दी दिलेली नव्हती असे कथन केलेले आहे. त्यामुळे सदर वस्तुस्थितीबाबत पुरावा नोंदविल्याशिवाय दाव्याला कायदयाची बाधा आहे असे म्हणता येणार नाही. वादी यांनी वादपत्रामध्ये दाव्यास कारण प्रतिवादी यांनी दि. १५/०१/२०२५ रोजी त्यांचा दावा मिळकतीमध्ये हक्क नाकारला तेव्हा प्रथम कारण घडले असे दर्शविलेले आहे. त्यामुळे दाव्याला कारण घडल्यानंतर दावा हा मुदतीत आहे हे प्रथमदर्शनी दिसून येते. सदरचा दावा हा वाटप करुन मिळण्यासाठी व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल असल्यामुळे दिलेला कोर्ट फी स्टॅम्प हा सद्यस्थितीला बरोबर दिलेला आहे हे प्रथमदर्शनी दिसून येते. अश्या

परिस्थितीत सदरचा दावा हा कायदयाच्या तरतूदींना बाधा आणणार आहे असे म्हणता येणार नाही. सबब प्रस्तूत दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार प्रतिवादी यांनी दाखल केलेला अर्ज हा नामंजूर होणेस पात्र आहे. सबब मी मुददा क्रं. १ हा नकारार्थी नोंदवून मुददा क्रं. २ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज नि. १३ हा नामंजूर करणेत येत आहे.

SUVARNA AVINASH KULKARNI
Digitally signed by SUVARNA AVINASH KULKARNI
Date: 2026.07.22 10:43:23 +0530

उरण                    (एस.ए.कुळकर्णी)
दिनांकः २१.०७.२०२६                    सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), उरण.